अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींची स्मारक बांधणे तसेच ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाच्या स्थळांचा विकास करणे या योजनेंतर्गत दिक्षाभूमी, नागपूर येथे विविध विकास कामे करण्याकरिता निधी उपलब्ध करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : सान्यावि-२०१८/प्र.क्र.१०१/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ३१ मार्च, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/ प्र.क्र.६१/ बांधकामे, दि.१६/१२/२०१५.

२) शासन शुध्दिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/प्र.क्र.६१/ बांधकामे, दि.०५.०३.२०१८.

३) नगर विकास विभागाकडील क्रमांक-बैठक-२०१८/प्र.क्र.२४/नवि-२४, दि.२७.०३.२०१८ रोजीचे बैठकीचे पत्र.

४) महानगर आयुक्त, नागपूर महानगर विकास प्रदेश विकास प्राधिकरण यांचे दि.२७.०३.२०१८ रोजीचे पत्र.

प्रस्तावना : -

लेखाशीर्ष २२२५-३६३६ अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींची स्मारक बांधणे तसेच महत्वाच्या सांस्कृतिक व ऐतिहासीक स्थळांचा विकास करण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्याविषयीचे निकष, मार्गदर्शक तत्वांना संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीची बैठक दि.२७.०३.२०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत दिक्षाभूमी, नागपूर येथील विकास कामासाठी रु.१००.०० कोटी (अक्षरी शंभर कोटी फक्त) इतका निधी मान्य करण्यात आला आहे. तसेच सदर कार्यक्रम राबविण्यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची नोडल एजेंन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने सन २०१७-१८ या वर्षाकरिता २२२५-३६३६ या लेखाशीर्षाखाली उपलब्ध असलेल्या निधीमधून दिक्षाभूमी, नागपूर येथील विकास कामाकरिता रु.४०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीची बैठक दि.२७.०३.२०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती त्यातील निर्णयानुसार दिक्षाभूमी, नागपूर येथील विकास कामांना रु.१००.०० कोटी (अक्षरी शंभर कोटी फक्त) इतका निधी देण्यास मान्यता देण्यात आली

आहे सदर कार्यक्रम राबविण्यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची नोडल एजेंन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे तसेच उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयामध्ये सदर शासन निर्णयात प्रस्तावित प्रकल्पाच्या एकूण अंदाजपत्रकीय खर्चामध्ये शासनाचा हिस्सा ९० % व संबंधित संस्थेचा हिस्सा १० % इतका असेल अशी अट नमूद केली आहे. त्यामुळे या रु.१००.०० कोटी मध्ये संस्थेचा हिस्सा १० % प्रमाणे रु.१०.०० कोटीचा Upfront सहभाग आवश्यक आहे व शासनाचा सहभाग रु.९०% प्रमाणे रु.९०.०० कोटी असणार आहे. त्यामुळे शासनाच्या सहभागातून निर्माण होणाऱ्या मालमत्तेमध्ये शासनाची मालकी राहिल हे स्पष्ट करण्यात येत आहे. त्यानुषंगाने सन २०१७-१८ या वर्षाकरिता २२२५-३६३६ या लेखाशीर्षाखाली उपलब्ध असलेल्या निधीतून दिक्षाभूमी, नागपूर येथील विविध विकास कामांकरिता निधी उपलब्धतेनुसार रु.४०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ता.क्र.१, दि.१० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/ इमारती-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

६) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापूर्वी अंदाजपत्रकावर उपभोक्ता विभागाच्या वतीने सक्षम अधिकाऱ्याचे साक्षांकन आवश्यक आहे.

७) सदर काम नागपूर महानगर विकास प्राधिकरणामार्फत करण्यात यावे.

८) सदर वास्तूचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर इमारतीवर सामाजिक न्याय विभागाचा ९० % अधिकार/मालकी असेल त्याप्रमाणे इमारतीच्या प्रवेश व्दारावर उपरोक्तबाबीचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा व याबाबतचा करारनामा संबंधित प्रादेशिक उपायुक्त व संस्था यांच्यामध्ये करण्यात यावा.

२. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयात नमूद मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन दिक्षाभूमी, नागपूर येथे विविध विकास कामे करण्याकरिता या प्रकल्पावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची राहील.

३. शासनाने विहित केलेल्या व वेळोवेळी करण्यात येणाऱ्या अटी संबंधित संस्थेस मान्य असल्याबाबत करारपत्र करुन घ्यावे. शासनाच्या वतीने करारपत्रावर सही करण्यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, नागपूर यांनी प्रकल्पाच्या बांधकामाच्या सद्य:स्थितीचा त्रैमासिक अहवाल आणि

वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना वेळीच सादर करण्याची दक्षता घ्यावी.

४. सदर योजनेअंतर्गत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी मंजूर निधी आहरित करुन तो महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांच्याकडे सुपुर्द करावा. तसेच योजनेअंतर्गत मंजूर निधीचे वितरण हे संदर्भ क्र. १ व संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयातील अटीच्या अधीन राहुन काटेकोरपणे करण्याची जबाबदारी आयुक्त, समजाकल्याण, पुणे यांची राहील.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१८०३३११०२९१८६२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.03.31 23:23:41 +05'30'

(अनिल को.आहिरे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२) महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर.
३) आयुक्त, महानगरपालिका, नागपूर.
४) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
५) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
६) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
७) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
८) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा/लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
९) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर.
१०) सहायक आयुक्त, समाजकल्याण, नागपूर.
११) मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव.
१२) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव.
१३) सचिव, दिक्षाभूमी स्मारक समिती, नागपूर, जि.नागपूर.
१४) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१५) निवडनस्ती.